Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2501I1VXIIIP0004
e-ISSN No. 2394-8426
Monthly Issue
JAN-2025
Issue–I, Volume–XIII

# आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटूंबातील मुलांच्या व्यथा -एक अभ्यास

**प्रतिभा किशन पवार**
संशोधक विद्यार्थी
शिक्षणशास्त्र विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

**प्रा. सुनिल बी. वाकेकर**
सहाय्यक प्राध्यापक
फोस्टर डेव्हलपमेंट कॉलेज ऑफ एज्यूकेशन,
शिवाजीनगर, छत्रपती संभाजीनगर

**प्रस्तावना :-**

स्वातंत्र्यापूर्वीपासून आजपर्यंत शेतकऱ्यांच्या स्थितीमध्ये अनुकूल बदल होण्याऐवजी प्रतिकुल आर्थिक, सामाजिक, बदल झालेले आहे. ओला-सुका दुष्काळ पडल्यास दुबार-तिबार पेरणीचेही संकट ओढाव्ल्यास मुलांचे लग्न, शिक्षणाचा खर्च, आरोग्याचा खर्च वाढण्यास तो दिशाहीन अस्वस्थ होऊन वरील, तशी वाढलेल्या खर्चाचा कर्जबाजारीपणामुळे गाहाळून जाऊन शेतकरी आत्महत्या करत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या ज्या कुटूंबात अशा घटना घडतात त्या कुटूंबातील लहान मुलांवर परिस्थितीचे जे संकट आणते ते वास्तव अत्यंत भयंकर आणि मन हेलावून टाकणारे असते. या कुटूंबातील मुलांना अन्न, पाणीही वेळेवर मिळत नाही तर सुध्दा आरोग्य आणि शिक्षण या सुविधा त्यांच्यापासून कोसो दूर असतात, त्यांचे बालपणे कोमेजुन जाते.

आत्महत्या करणारा शेतकरी मेल्यानंतर त्यांच्या कटूंबात निर्माण होणारी परिस्थिती जसे दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी लागणारा खर्च, मुलांच्या शिक्षणासाठी लागणारा खर्च

कुटूंबातील ताणतणाव, मुलांची समाजवृत्ती भूमिका समाजाची मुलांच्या शिक्षणासंदर्भातील भूमिका शाळांनी अशा मुलांच्या शिक्षणासाठी राबवलेल्या योजना व त्यांना आत्महत्याग्रस्त कुटुबांनी दिलेला प्रतिसाद या सर्व प्रश्नांच्या विळाख्यात सापडलेल्या शेतकरी कुटुंबातील मुलांच्या भावना अभ्यास करावयाचा आहे.

आत्महत्या ग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबातील मुलांच्या सदयस्थितीचा अभ्यास करुन संपुर्ण समस्येचे निराकरण करण्यात येणार आहे.

**संशोधनाची गरज :-**

आत्महत्याग्रसत शेतकरी कुटुंबातील शिक्षण घेत असलेली पाल्ये यांच्याकडे केंद्रित करुन त्या कुटूबाच्या व त्याच्या पाल्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करतो. त्यांच्या प्रश्नावर संशोधन करणे या उददेशाचे या कुटूंबातील पाल्ये प्रस्तुत संशोधनाचे केंद्रबिंदु मानण्यात आले आहे.

ग्रामीण भागातील शिक्षणाची आर्थिक परिस्थितीत, घरातील जबाबदाऱ्या, निरक्षर पालक यामुळे मुले शिक्षणापासून वंचित राहत आहे. ज्या पालकांना शिक्षणाचे महत्त्व कळाले आहे त्यांच्याकडे शिक्षणावर करावा लागणाऱ्या खर्चासाठी पैसा नाही त्यामुळे त्यांचे स्वप्न पूर्ण होत नाही.

एकीकडे शहरीकरणाने वेग धरला आहे, तर दुसरीकडे ग्रामीण भागात गरीब शेतकरी मजूर हे मागासलेले आयुष्य जगत आहे. एकीकडे आपण म्हणतो आपल्या देशाने प्रगती केली आणि

दुसरीकडे आपल्या देशातील शेतकरी कर्जबाजारी होऊन आत्महत्या करीत आहे. कादयाने सर्वांना शिक्षणा हक्क दिला मग तरीही ही मुले शिक्षणापासून वंचित का राहतात याची कुठेतरी विचार करावा लागेल. ग्रामीण भागात शाळा उपलब्ध नसतात त्यामुळे ही मले शिक्षणापासून त्यांच्याकडे पैसा नसणे, रोजची भाकरी खायची जीचे वांदे आहे तिथे शिक्षणावर कोठून पैसा खर्च करणार आहे.

आर्थिक अडचणी दवाखाने, मुलांची लग्ने, शेतीवरील खर्च व कर्ज यांचा विचार करत करत ग्रामीण भागातील विद्यार्थी पैशाच्या चक्रव्युहात अडकतो. काम मिळेल तेंव्हा चुल पेटेल अशी अवस्था असते. माणसाच्या जीवनाला खरा आकार शिक्षणामुळे येतो यामुळे मुलांना शिकण्याच्या वयात शिक्षण मिळाले पाहिजे. त्याला शिक्षणापासून वंचित ठेवता येत नाही.

**संशोधनाची उदिदष्टे :-**

1) आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटूंबाचा शोध घेणे.
2) आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबातील मुलांचा शोध घेणे.
3) आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांच्या समस्यांचा शोध घेऊन उपाययोजनासुचविणे.

**संशोधन पध्दती :-**

सदरील संशोधनासाठी आवश्यक असलेली माहिती मिळविण्यासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

**जतसंस्था व्याप्ती :-**

प्रस्तुत संशोधनासाठी मराठवाडयातील 300 आत्महत्याग्रस्त शेतकरी मुलांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**संशोधन क्षेत्र व्याप्ती :-**

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटूंबातील मुलांच्या समस्येपुरते हे संशोधन मर्यादीत आहे. संशोधन क्षेत्र मराठवाडा असुन छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड, लातूर, धाराशिव या आठ जिल्हयातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांच्या समस्येचा अभ्यास करण्यात आला आहे.

**आत्महत्याग्रस्त कुटुंबातील मुलांच्या व्यथा :-**

आत्महत्या झालेल्या शेतकरी कुटूंबातील पुढची पिढी म्हणजे लहान मुल व किशोरवयीन मुले मुली यांच्या अस्वस्थता आहे अस्थैर्य आहे सत्ते भितीचे सावट आहे त्यातच ते जगत आहे. त्यांना समाजाकडून कुटुंबियांकडून भावनिक आणि आर्थिक आधार मिळाला नाही. तर ही मुलेही दु:खाच्या वाटेवर जातील जात राहतील. काही आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची मुले झालेल्या घटनांना स्वीकारुन आपले आयुष्य पुन्हा सुरळीत करण्याचे प्रयत्न करत आहे. पण त्याचाही त्यांना आकाली प्रौढवृत्ती लागत आहे. घराची जबाबदारी घ्यावी लागत आहे.

एकीकडे स्वत:चे घर आहे शेती आहे पण ते पुरेसे नाही तर दुसरीकडे शेती केली तर वडीलांसारखे मरावे लागेल अशी भीती यामुळे ही पुढची पिढी शेती करणार नाही असा ठाम विश्वास मांडते. आम्हाला नोकरी दया आम्ही ती करु पण शेती करणार नाही असे विचार या कुटूंबातील बहुतेक मुलं बोलुन दाखवतात. आजच्या परिस्थितीत सर्वांना नोकरी मिळणे शक्य नाही ही वस्तुस्थिती त्यांना पटत नाही हे प्रश्न चुटकीसरशी सुटणारे नाही किंवा सर्व प्रश्नासाठी एक समान उत्तरही शक्य नाही तेंव्हा एकीकडे गावातील शेतीचा विकास, जनसंवर्धन, शालेय शिक्षण, व्यवसायिक प्रशिक्षण, शेतीसोबत जोडधंदे नवी कल्पना व

प्रयोगांना प्रोत्साहन आशा बहुपर्यायी उपयांचा अवलंब करणे पुढील पिढीला सावरण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

**समारोप :-**

भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा शेती हाच असल्याचे सांगणाऱ्या सरकारने स्वातंत्र्यानंतर काळात शेतकऱ्यांनाचा बांधावर सोडल्यामुळे शेती आणि शेतकऱ्याची अवस्था भीषण झाली आणि जगाचा पोशिंदा हा कर्जबाजारीपणा, वाढती महागाई, कुटूंबाला पोसाताना त्याची हतबलता यामुळे महाराष्ट्रासह देशभ्रात गेल्या अनेक वर्षापासून सुरु असलेले शेतकऱ्यांचे आत्महत्याचे सत्र अदयापही थांबलेले नाही. हे तुमच्या आमच्या समोरील एक मोठे आव्हान आहे.

शेतकरी आत्महत्या केलेल्या अभ्यासावरुन व विविध तज्ञांच्या अधिकच्या राजकीय पदाधिकाऱ्यांच्या व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटफंबाच्याद्वारे प्रत्यक्ष प्रश्नावली व मुलाखती घेतलेल्या माहितीच्याआधरे धोक्यात आहे. सांगता येईल की, शेतकरी आत्महत्या ही बहुआयामी समस्या असुन याकरीता अनेक घटक व्यवस्था आणि धोरणे कारणीभूत आहेत त्यामुळे यामधील एका क्षेत्रावरच भर देऊन व बदल करुन चालणार नाही तर शेतकऱ्यांच्या सर्वांगीण दिर्घकालीन व शाश्वत विकास करता येईल अशा उपाय योजना करणे गरजेचे आहे.